# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| Office : 02382-250634<br>Fax :- 02382-251866<br>E-mail:- celatur@mahadiscom.in | महावितरण | Office of the Exe. Engr. CGRF<br>Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli,<br>Latur – 413512 |
| EE/CGRF/LTR/127 | | Date :- 01.08.2019 |

**ग्राहक तक्रार क्र.** : १६/२०१९
**तक्रार दाखल दिनांक** : ०४.०६.२०१९

**प्रति,**

१. **मे. इंडस टॉवर्स लि.**
२०१०, ई-कोर, दुसरा मजला,
मार्वल एज, विमान नगर, पूणे - ४११०१४.

२. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
अति-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उत्तर (श) उपविभाग, लातूर

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. १६/२०१९ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन मे. इंडस टॉवर्स लि, यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडलेली आहे.

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**
१) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**
१) अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, लातूर
२) कार्यकारी अभियंता (प्र) म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, लातूर
३) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, लातूर

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर

**ग्राहक तक्रार क्रमांक : १६/२०१९ (दिनांक : ०४.०६.२०१९)**

**मे. इंडस टॉवर्स लि.**

**२०१०, ई-कोर, दुसरा मजला,**

**मार्वल एज, विमान नगर, पूणे - ४११०१४.** **--ग्राहक अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**अति-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या.**

**उत्तर (श) उपविभाग, लातूर** **-- गैरअर्जदार**

| | | | |
|---|---|---|---|
| **कोरम :** | **श्री. पंडितराव बी. मोरे** | **:** | **अध्यक्ष** |
| | **श्री. सुधीर भाऊराव देशमुख** | **:** | **सदस्य** |
| | **श्री. जी. एन. गायकवाड** | **:** | **सचिव** |

## निकाल

**दि. ०१.०८.२०१९**

१) ग्राहक अर्जदार, (ग्राहक क्र. ६१०५५०५३५९२३) "मे. इंडस टॉवर्स लि. " २०१०, ई-कोर, दुसरा मजला, मार्वल एज, विमान नगर, पूणे. यांनी त्यांची तक्रार 'अ' फॉर्ममध्ये दि. ०४.०६.२०१९ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे. त्यानुसार ग्राहकाचे असे म्हणणे आहे की, त्यांची अनामत ठेव रक्कम रु. १३०००/ त्यांना परत देण्यात यावी.

२) गैर अर्जदार महावितरण तर्फे श्री. मंगलसिंग बंडू चव्हाण, अति-कार्यकारी अभियंता, उत्तर (श) उपविभाग, लातूर यांनी सदर तक्रारीच्या बाबतीत लेखी निवेदन सादर कलेले आहेत. की, सदर ग्राहकाचे वीज कन्केशन हे लातूर शहर शाख क्र. ६ या भागामध्ये येत असून त्याचा वीज पूरवठा हा दि. १६.०६.२००७ रोजी चालू करण्यात आलेला आहे. ते आजतागायत कंपनीचे अधिकृत वीज ग्राहक आहेत.

३) सदर वीज ग्राहकाने गा. त. नि. मंच. लातूर कडे आपली तक्रार नोंद करताच सबंधित तक्रारीच्या अनुषंगाने ग्राहक मंचाने दिलेल्या सुचनेनुसार व मंचाने सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता महावितरण तर्फे देण्यात आलेले वीज कनेक्शनवर त्वरीत कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश सबंधिताना देण्यात आले व त्यानुसार सदरचे वीज ग्राहकाचा वीज पुरवठा हा शहर शाखा

क्र. ६ लातूर यांचा प्राप्त अहवाल क्र. AE/U-६LTR/१२२ दि. २३.०७.२०१९ नुसार कायमस्वरुपी बंद करण्यात आलेला असुन त्याचा अहवाल सोबत सादर केलेला आहे.

४) मे. इंडस टॉवर्स लि. या नावांवर मोबाईल टॉवर चे अनेक वीज कनेक्शन आहेत सदर वीज कनेक्शनचा वीज बिल भरणा, सुरक्षा ठेव, इत्यादी बाबी ह्या मुख्यालय स्तरावर ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे होत असतात, त्यामुळे सदर वीज ग्राहकाची सुरक्षा ठेव भरणा केलेली मुळ पावती किंवा त्या ऐवजी Idiminity Bond, Bank Passbook zerox, विहित नमुन्यातील अर्ज इ. कागदपत्र सादर केलेल्या कागदपत्रासोबत आढळून आले नाहीत, त्यामुळे सदर कार्यालयास त्यावर पुढील योग्यती कार्यवाही करता आली नाही, ग्राहकाची सुरक्षा ठेव परत घेण्यासाठी सदरची कागदपत्र कंपनीकडे सादर करणे गरजेचे आहे. सदरचे कागदपत्र उपलब्ध होताच या कार्यालयाकडून सुरक्षा ठेव परत करण्याची पूढील योग्यती कार्यवाही केली जाईल.

## आदेश

१) ग्राहक अर्जदाराची 'अ' फॉर्म मधील तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

२) ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय अमान्य असल्यास मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत 'ब' फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सादर करु शकतात. फॉर्म 'ब' या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल

महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,

प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,

नागपूर-४४००१३.

दुरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८

ठिकाण : - लातूर

दिनांक :-०१.०८.२०१९

| | | |
|---|---|---|
| 1.8.19 | 1-8-19 | 1/8/19 |
| अध्यक्ष | सदस्य | कार्यकारी अभियंता/सचिव |
| ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर |